**पवन ऊर्जा निर्मिती धोरण,२००४ अंतर्गत राज्यात पवनऊर्जा प्रकल्प उभारणेसाठीची कार्यपध्दती**

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय, क्र.पवन-२००५/प्र.क्र.२२२२/ऊर्जा-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांकः- ३० जून, २००५

वाचाः शासन निर्णय क्रमांक : पवन-२००४/ प्र.क्र.१२७४/ ऊर्जा-७, दि.२६ फेब्रुवारी,२००४

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासनाने दि.२६.२.२००४ रोजी पवनऊर्जा प्रकल्पांसाठी धोरण जाहीर केलेले आहे. तसेच केंद्र शासनामार्फत दि.१०.६.२००३ पासून विद्युत अधिनियम २००३ लागू करण्यात आलेला आहे. त्या अन्वये वीज निर्मिती प्रकल्प उभारणे किंवा स्वतःच्या वापराकरिता वीज निर्मिती करणे यासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी घेणे बंधनकारक नाही. तथापि, पवनऊर्जा प्रकल्पांची निष्कासन व्यवस्था व पोहोच रस्ते महाऊर्जामार्फत विकसित होणार आहेत व त्यासाठी हरित ऊर्जा निधीचा वापर केला जाणार आहे. खाजगी उत्पादक/विकासक/गुंतवणूकदार यांनी प्रस्तावित केलेल्या पवनऊर्जा प्रकल्पांसाठी पोहोच रस्ते बनविणे, निष्कासन व्यवस्था पुरविणे व महाराष्ट्रातील पारेषण व वितरण कंपन्यांच्या विद्युत प्रणालीला (Grid) जोडणे यात समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच विविध उत्पादक, विकासक, गुंतवणूकदार, महाऊर्जा, राज्यातील पारेषण, वितरण कंपन्या, इतर परवानाधारक, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग आणि शासन यामध्येही समन्वय असणे गरजेचे आहे. राज्यामध्ये पवनऊर्जा प्रकल्पांचा विकास सुयोग्य रीतीने व्हावा, त्यात योग्य तो समन्वय कायम असावा व प्रकल्प विहित कालावधीत कार्यान्वित व्हावेत, प्रकल्पांचे बारकाईने सनियंत्रण व्हावे, पोहोच रस्ते, निष्कासन व्यवस्था परिपूर्ण व दीर्घकालीन असावी यादृष्टीने राज्यात पवनऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी शासनाच्या धोरणाप्रमाणे कार्यपध्दती निश्चित होणे आवश्यक आहे.

**शासन निर्णयः**

पवन ऊर्जा निर्मिती धोरण, २००४ अंतर्गत उभारावयाच्या पवनऊर्जा प्रकल्पांसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्रामध्ये अपारंपरिक ऊर्जा साधनांचा, प्रकल्पांचा विकास व विस्तार करण्याचे अधिकार महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेकडे आहेत. त्यामुळे शासनाच्या धोरणाप्रमाणे राज्यामध्ये पवनऊर्जा प्रकल्पांच्या विकासाचे व विस्ताराचे काम महाऊर्जामार्फत करण्यात येईल.

२. केंद्र शासनामार्फत महाराष्ट्र राज्यात आजमितीस एकूण २८ पवनऊर्जा निर्मितीक्षम स्थळे जाहीर करण्यात आलेली आहेत. त्या स्थळांवर व त्या परिसरात पवनऊर्जा प्रकल्प उभारले जाऊ शकतात. तसेच यापुढे वेळोवेळी केंद्र शासनाकडून जाहीर होणाया स्थळांचाही त्यात समावेश करण्यात येईल.

३. वरील मुद्दा क्र. २ मधील स्थळांव्यतिरिक्त खाजगी उद्योजकांनी स्वखर्चाने वा-याचे मोजमाप करुन प्राप्त झालेली संकलित माहिती महाऊर्जाकडे दिल्यास ती माहिती महाऊर्जा केंद्र शासनाच्या अपारंपरिक ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे सदरचे स्थळ पवनऊर्जा प्रकल्पांसाठी योग्य असल्याचे जाहीर करण्यासाठी आपल्या शिफारशीसह सादर करेल.

४. पवनऊर्जा प्रकल्पातून अधिक ऊर्जा निर्मितीसाठी वा-याचा वेग (Wind Velocity) व वायाची ऊर्जा घनता (Wind Power Density) जास्त असलेल्या पवनऊर्जा निर्मितीक्षम स्थळांना महाऊर्जामार्फत प्राधान्य दिले जाईल.

५. शासन निर्णयानुसार निष्कासन व्यवस्था विकसित करण्याचे काम महाउर्जा किंवा खाजगी प्रवर्तक महाराष्ट्रातील पारेषण व वितरण कंपन्यांच्या तांत्रिक प्रमाणानुसार व अंदाजपत्रकानुसार करुन घेईल. या कामांसाठी लागणा-या निधीच्या ५० टक्के रक्कम हरित उर्जा निधीमधुन अनुदान म्हणून उपलब्ध करुन दिली जाईल व ५० टक्के रक्कम बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात देण्यात येईल. हरित उर्जा निधी उपलब्ध होईपर्यंत खाजगी प्रवर्तकांकडून मुलभूत सुविधा विकासासाठी प्रति मेगावॅट महाउर्जा ठरवेल ती अग्रिम रक्कम जमा करण्यात येईल व हरित उर्जा निधी उपलब्ध झाल्यानंतर शासन निर्णयानुसार गुंतवणूकदारांच्या अग्रीम रकमेचे समायोजन करण्यात येईल.

६. खाजगी प्रवर्तकांना महाऊर्जा आणि राज्यातील पारेषण व वितरण कंपन्यांनी मूलभूत सुविधा निर्माण करण्याची दिलेली संमती म्हणजे नवीन धोरणांतर्गत पवनऊर्जा प्रकल्पांना कार्यान्वित करण्याची हमी नाही.

७. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने २००७ पर्यंत ७५० मेगावॅट क्षमतेचे उद्दिष्टे निश्चीत केलेले आहे. प्रस्तावित ठिकाणी विकासक/उत्पादक/गुंतवणूकदाराने मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी तयारी दर्शविल्यानंतर महाऊर्जा एका वेळेस जास्तीत जास्त २५ मे.वॅ. क्षमतेचे पवनऊर्जा प्रकल्प उभारणी व कार्यान्वित करणेसाठी संमती देईल व हे प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी जास्तीत जास्त ९ महिन्यांचा कालावधी दिला जाईल.

उत्पादक/ विकासक/गुंतवणूकदार यांनी महाराष्ट्र राज्यात आजपर्यंत किती प्रकल्प आस्थापित केलेले आहेत याचा आधार घेऊन खालीलप्रमाणे उद्दीष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

| विकासक/उत्पादक/गुंतवणूकदार यांनी महाराष्ट्रात पूर्वी आस्थापित केलेली पवनऊर्जा क्षमता (मे.वॅ.) | एका वेळेस उभारणी व कार्यान्वित करण्यासाठी देण्यात येणारे उद्दीष्ट (मे.वॅ.) |
|---|---|
| निरंक | १० मे.वॅ. पर्यंत |
| ५० मे.वॅ. पर्यंत व त्यापुढील | २५ मे.वॅ. पर्यंत |

वरील क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित केल्यानंतर विकासक/उत्पादक/गुंतवणूकदारांस पुढील प्रकल्प उभारण्यास व कार्यान्वित करण्यास अर्ज करता येईल. उत्पादक/विकासक/गुंतवणूकदारांची विश्वासार्हता व त्यांच्या मागील कामाच्या आढाव्यानुसार पुढील उद्दिष्ट देण्याचे अधिकार महासंचालक, महाउर्जा यांना असतील.

८. **सुरक्षा ठेव** : प्रत्येक विकासक/उत्पादक/गुंतवणूकदारांनी त्यांच्या प्रस्तावासोबत सुरक्षा ठेव रक्कम रु. १५ लक्ष प्रति मे.वॅ. जमा करावी. त्यानंतर त्यांना देण्यात आलेल्या उद्दीष्टाप्रमाणे ९ महिन्यांच्या कालावधीत प्रकल्प कार्यान्वित करणे बंधनकारक राहील. सदरचे प्रकल्प ९ महिन्यांच्या कालावधीत कार्यान्वित न झाल्यास ही सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल व ती महाऊर्जाच्या विकास निधीमध्ये वर्ग करण्यात येईल.

९. प्रकल्प उभारण्यासाठी सर्व खाजगी प्रवर्तक/उत्पादक महाऊर्जाकडे प्रक्रिया शुल्कासह (Application Fee) विहीत नमुन्यात अर्ज करतील (सादरीकरण शुल्क रु.३०००/- प्रति मे.वॅ.). सदर अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे :-

- पवनऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणाया जागेची कागदपत्रे (नोंदणीकृत खरेदी खत, ७/१२ उतारा, बिगर शेती परवाना).
- भू-विज्ञान व खनिकर्म विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
- विकास आयुक्त (उद्योग), यांचे जमिनीचा औद्योगिक वापरासाठीचे ना-हरकत प्रमाणपत्र.
- सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report).
- मायक्रो साईटींग प्लॅन.
- पवन विद्युत जनित्राची तांत्रिक माहिती, पॉवर कर्व्ह, मान्यताप्राप्त संस्थेचे चाचणी प्रमाणपत्र (Type Test Certificate).
- महाराष्ट्रातील पारेषण व वितरण कंपन्यांच्या विद्युत प्रणालीला (Grid-Connectivity) जोडणीसाठी केलेल्या अर्जाची प्रत.
- वन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (लागू असल्यास).

१०. प्रकल्पासाठी आवश्यक त्या सर्व कायदेशीर व वैधानिक बाबींची पूर्तता प्रकल्पधारकांकडून केली जाईल उदा. स्थानिक स्वराज्य संस्था, महसूल विभाग, खनिकर्म विभाग, प्रदूषण विभाग, वन विभाग, नागरी उड्डाण विभाग, समुद्र किनारपट्टी व संरक्षण विभागासारख्या संस्थेंचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' प्रकल्प धारकाने स्वतः प्राप्त करणे बंधनकारक असेल.

११. गुंतवणूकदारांच्या नावे प्रकल्पांचा अंतिम प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प उभारण्यासाठी महाऊर्जामार्फत **'मूलभूत सुविधा संमती'** प्रदान करण्यात येईल. सदरची संमती प्रदान करण्याचे अधिकार खालीलप्रमाणे असतील —

- १० मे. वॅ. क्षमतेपर्यंत (१० मे. वॅ. सहीत) - महासंचालक, महाऊर्जा
- १० मे. वॅ. वरील सर्व प्रकल्प - अध्यक्ष, महाऊर्जा

१२. निर्धारित केलेल्या क्षमतेपैकी कार्यान्वित होणाया पवनऊर्जा प्रकल्प प्रस्तावांची महाऊर्जामार्फत छाननी करण्यात येईल व प्रकल्प उभारण्यासाठी **'मूलभूत सुविधा संमती'** देण्यात येईल. त्यापुर्वी प्रवर्तक/विकासक/गुंतवणूकदारांनी रक्कम रु. ५ लक्ष प्रति मे.वॅ. इतके सादरीकरण शुल्क जमा करणे आवश्यक राहील.

१३. राज्यामध्ये उभारण्यात येणारी पवनऊर्जा जनित्रे अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत, मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या पवनऊर्जा धोरणानुसार राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त संस्थांकडून प्रमाणित असावीत. परंतु, केंद्रीय अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत, मंत्रालयाच्या धोरणानुसार पवनऊर्जा जनित्रांची कमीत कमी क्षमता २२५ कि.वॅट असणे आवश्यक आहे. तसेच पवनऊर्जा जनित्रांची यंत्रसामुग्री व पवन विद्युत जनित्रे ही नवीन असावीत, तसा दाखला प्रवर्तक/उत्पादक यांनी देणे बंधनकारक राहील.

१४. खाजगी प्रवर्तकाने राज्यातील पारेषण व वितरण कंपन्यांच्या संमतीने प्रकल्पाची विद्युत प्रणालीशी (Grid) जोडणी करुन प्रकल्प कार्यान्वित करावा. प्रकल्प उभारणी पूर्ण झाल्यानंतर तो कार्यान्वित झाल्याबाबतचा अहवाल प्रवर्तक/ विकासक /गुंतवणूकदाराने महाउर्जास सादर करणे आवश्यक आहे.

१५. प्रकल्पासंबंधी दोन अथवा त्यापेक्षा जास्त उत्पादक, प्रवर्तक अथवा गुंतवणुकदार यांचेमध्ये काही वाद अथवा वादसदृश परिस्थिती उद्‌भवल्यास त्याचे निरसन महासंचालक, महाऊर्जा यांचेमार्फत करण्यात येईल. महासंचालक, महाऊर्जा यांनी दिलेले निर्णय सर्व संबंधितांवर बंधनकारक राहतील.

१६. पवनऊर्जा प्रकल्पांसाठी राज्य व केंद्र शासनामार्फत लागू असणा-या प्रोत्साहनात्मक सवलती वितरित करण्याचे अधिकार महाऊर्जाकडे असतील.

१७. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी घेतलेले निर्णय वरील प्रकल्पांना बंधनकारक राहतील.

१८. महाऊर्जाने प्रकल्प उभारण्यासाठी दिलेली **'मूलभूत सुविधा संमती'** एका विकासक / उत्पादक / गुंतवणूकदारांकडून दुस-या विकासक/उत्पादक/गुंतवणूकदारांकडे हस्तांतरीत करता येणार नाही. तथापि, विकासक/उत्पादक यांचेकडून खाजगी गुंतवणूकदाराकडे महासंचालक, महाऊर्जा यांच्या परवानगीने हस्तांतरीत करता येईल.

१९. वन जमिनीवर पवनऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी खाजगी विकासक/उत्पादक/गुंतवणूकदारांनी महाऊर्जाकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. सदर प्रस्तावांची महाऊर्जातर्फे सखोल छाननी करुन वन व महसूल विभागाकडील शासन निर्णय क्र.एफएलडी/१००३/सीआर १९४/एफ १० दिनांक २१-७-२००४ नुसार, वन विभागाकडे शिफारस करण्यात येईल.

२०. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर गुंतवणूकदार आपल्या स्वेच्छेने प्रकल्पाला लागू असणाया अटी व शर्ती सहीत प्रकल्पाची विक्री करु शकतील. अशा प्रकारच्या खरेदी विक्रीस महासंचालक, महाऊर्जा यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

२१. काही कारणांस्तव गुंतवणूकदाराला प्रकल्पातील एक किंवा एकापेक्षा जास्त पवन जनित्रे दुस-या ठिकाणी स्थलांतर करावयाचे असल्यास महासंचालक, महाऊर्जा यांचे संमतीने करता येतील.

आस्थापित झालेल्या पवनऊर्जा प्रकल्पांच्या विद्युत जनित्रांची जागा बदलासाठी व मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देण्याचे अधिकार महासंचालक, महाऊर्जा यांना राहतील. यासाठी गुंतवणूकदारांना प्रक्रिया शुल्क म्हणून रु. २ लाख प्रति पवन विद्युत जनित्र याप्रमाणे रक्कम महाऊर्जाकडे जमा करावी लागेल. परंतु, जी पवन विद्युत जनित्रे दि.१२-३-९८ च्या धोरणानुसार आस्थापित झालेली आहेत व ज्यांना विक्रीकराची सवलत लागू आहे अशा पवन विद्युत जनित्रांची जागा बदलांना परवानगी देणेचे आदेश शासन स्वतंत्ररित्या निर्गमित करेल.

२२. पवनऊर्जा प्रकल्पांचा विकास होण्यासाठी पोहोच रस्त्यांची आवश्यकता असते. पवनऊर्जा प्रकल्पांचा वेगाने विकास होण्यासाठी व निर्धारित लक्ष्य विहीत कालावधीत पूर्ण करणेस पोहोच रस्त्यांचा विकास महाऊर्जामार्फत मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून करण्यात येईल. त्याचा १०० टक्के खर्च हरित ऊर्जा निधीतून भागविण्यात येईल.

२३. पवनऊर्जा प्रकल्पांसाठीच्या रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी २००४-०५ या आर्थिक वर्षापासून दिनांक २५ ऑगस्ट, २००४ पर्यंत आस्थापित केलेल्या पवनऊर्जा प्रकल्पधारकांकडून रु. १०,०००/- प्रति मे.वॅ. प्रतिवर्ष व त्यानंतर भविष्यात आस्थापित होणाया पवनऊर्जा प्रकल्प धारकांकडून रु.१५,०००/- प्रति मेगावॅट प्रतिवर्ष महाऊर्जातर्फे आकारणी करण्यात येईल. त्यातून पोहोच रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीचा खर्च भागविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

( सिध्दार्थ चवरे )
कक्ष अधिकारी

प्रति,

१) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, म्हाडा कर्मशिअल कॉम्प्लेक्स, त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची सुत्रधारी कंपनी , मर्यादित , हॉंगकॉंग बँक बिल्डींग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी , मर्यादित , प्रकाशगंगा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई- ५१

४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य (वीज) वितरण कंपनी , मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी , मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

६) अप्पर मुख्य सचिव ( वित्त), वित्त विभाग, मंत्रालय. मुंबई-३२

७) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई-३२

८) सचिव (उद्योग), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

९) विकास आयुक्त, (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई-३२

१०) मुख्य अभियंता (विद्युत), महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग,प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई-७१

११) व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम, मुंबई

१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

१३) निवडनस्ती, (ऊर्जा ७)